


# सणस कन्या शाळेत नाटकाचे सादरीकरण

**पुणे :** पंख सामाजिक संस्था व क्विकहिल फाउंडेशनच्या शाळांगण प्रकल्पांतर्गत कै. बाबूराव सणस कन्या शाळा (मंगळवार पेठ) येथे नुकतेच मुलींच्या शिक्षणावर आधारित 'सोंगटी' या नाटकाचा प्रयोग सादर केला गेला. मराठी अभिनेत्री माधवी सोमण व अंजली धारू यांनी हे नाटक सादर केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नाटकाचा प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या नाटकाला कै. बाबूराव सणस कन्या शाळा व वसंतदादा पाटील शाळेच्या मुली आणि त्यांचे पालक उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण मंडळ अध्यक्षा वासंती काकडे, शिक्षणाक्षिकारी दीपक माळी उपस्थित होते. तसेच क्विकहील फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, सणस शाळेच्या मुख्याध्यापिका निर्मला कांबळे, पंखचे संस्थेच्या सीमा ननावरे, कल्याणी भाबड, प्रसाद भिरंगे, तसेच स्मिता आपटे या वेळी उपस्थित होते.